**नि.क्र. ५५ वरील आदेश**

( दि.०४.१२.२०२३ रोजी पारीत )

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज मुख्याधिकारी, नगरपरिषद माजलगाव यांना मिळकत क्र. २१/१३१ या मिळकतीचे बांधकाम परवाना, नकाशा इस्टीमेट व संलग्न कागदपत्रे मुळ संचिकेसह साक्षदेणेकामी साक्षसमन्स काढावे याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, मंजुर नकाशा व बांधकाम परवान्याप्रमाणे पुर्ण काम केले नाही. सदर कागदपत्रे आवश्यक आहेत असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, मुख्याधिकारी हे दाव्यात पक्षकार नाहीत. प्रस्तावित कागदपत्रे ही वादी मिळवु शकतो, असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीने वादग्रस्त खिडक्या कायमस्वरूपी बंद कराव्यात म्हणुन आज्ञाकारी हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की,मंजुर नकाशा व बांधकाम परवान्याप्रमाणे पुर्ण काम केले नाही. सदर कागदपत्रे आवश्यक आहेत. सदर कागदपत्रे ही प्रस्तावित साक्षीदार यांचे अखत्यारीत आहेत. दाव्याचा न्यायनिर्णय गुणानुगुणावर होण्यासाठी सदर कागदपत्रे अभिलेखावर असणे महत्वाचे आहे. अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**—:आदेश:—**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुख्याधिकारी/ संबंधीत कर्मचारी नगरपरिषद माजलगाव यांना मिळकत क्र. २१/१३१ या मिळकतीचे बांधकाम परवाना, नकाशा इस्टीमेट व संलग्न कागदपत्रे मुळ संचिकेसह साक्षदेणेकामी येणेसाठी साक्षसमन्स काढावे.

३. वादीने आवश्यक तो साक्षभत्ता भरावा.

सही /-
(र.आ.सावंत)
सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)
माजलगाव.

दि.०४.१२.२०२३

**CERTIFICATE**

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order"

| | |
|---|---|
| Dictated on | 04-12-2023 |
| Transcribed On | 04-12-2023 |
| Checked & signed on | 04-12-2023 |

Sd/-
( P.P.Andurkar )
Steno Gr-III,
Jt.C.J.J.D. Majalgaon.